भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५८०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०८/२०१७

**१)जनरल स्टोर्स दुकानाची चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०८/२०१७ चे २१.०० वा. ते दि. १७/०८/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात चोराने युगल जनरल स्टोर्स दुकानाचे वरच्या मजल्याचा लाकडी दरवाजा तसेच ग्रिल तोडुन आत प्रवेश करून चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी प्रमोद हरीभाऊ बावणकर वय ५२ वर्ष रा. भाईतलाव वार्ड पवनी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४५७,३८०,५११ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) सोन्याचे दागिने व नगदी पैशाची चोरी . :—**

दिनांक .२२/०७/२०१७ चे १२.०० वा. ते आज पावेतो यातील फिर्यादी देवदास गोमाजी गोठे वय ५५ वर्ष रा. सोनी हा व घरचे सर्व लोक रोवणा करण्यास शेतात गेले असता यातील आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन घराचे छपराचे खुल्या धाब्यावरून पेटीमध्ये ठेवलेले ५ ग्रॅम सोन्याची नथ, ३ ग्रॅम सोन्याची बारी व नगदी १००/रु च्या २० नोटा एकुण २,०००/रु असा एकुण २२,०००/रु चा माल चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन गालाला चावा घेवुन खाली पाडुन मार लागल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०८/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादी अनमोल प्रकाश घोडमोरे वय २७ वर्ष, रा. मालीपार यांचे सोबत कोंबडीच्या मटणाची भाजी बनविणेच्या कारणावरुन भांडण करुन खाली पाडुन डावे गालाला चावा घेतल्याने व डाव्या हाताच्या भुजेवर, डावे हाताच्या मोंडया जवळ घसाटा मार लागल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व वैदयकीय अहवाला वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) जंगलातील लाकुड कटाईचे पैश्याचे कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०८/२०१७ चे ०९.३० ते १०.३० वा. दर. यातील फिर्यादी वसीम उददीन रियाज उददीन खान वय ५३ वर्ष, रा. कोका हे वनविभागत नोकरीवर असुन फिर्यादी व त्याचे सहकारी बिट रक्षक विपीन डोंगरे यांना आरोपीने जंगलातील लाकुड कटाईचे ५०,०००/—रु. चे मागणीचे कारणावरुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन निलबिंत करण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २९४,५०६,५०७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सेलोकर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०८/२०१७ चे १३.३० वा. दर. यातील फिर्यादी ही आपले किराणा दुकानात हजर असतांनी यातील आरोपी हा तिचे दुकानात दारु पिवुन जावुन तुझा मोबाईल सुरु का ठेवत नाही म्हणुन तिला अश्लिल शब्दात शिवीगाळ मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २९४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**६) अवैध रित्या जनावरांना कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०८/२०१७ चे ४.०० वा. दर. यातील फिर्यादी हे पोलीस जिपने रात्र गस्त पेट्रोलींग पोलीस स्टॉपसह करीत असतांनी मुखबीर कडुन माहीती मिळाली की यातील आरोपी ट्रक चालकाने आपले ताब्यातील ट्रक मध्ये अवैध रित्या जनावरे भरुन एन एच ०६ रोडने येत असल्याची माहीती मिळाल्याने त्यास थांबवुन ट्रकचा मागील पल्ला उघडुन पाहणी केली असता आरोपीने आपले ताब्यातील ट्रक मध्ये एकुण २३ बैल किंमती २,३०,०००/—रु. चे अवैध रित्या अपुऱ्या जागेत कोंबुन जनावरांना त्रास होईल अश्या स्थितीत वाहतुक करीत असतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. जांभुळकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९ भादंवि. सहकलम ११(१)(घ)(ड) प्राणी. सु. वा.कायदा सहकलम ९ प्राणीसंरक्षण अधिनीयम १९७६ सहकलम ११९ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. ताराम पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.आरोपी अटक आहे.

**७) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक १७/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, साकोली, पवनी, अडयाळ, लाखनी व लाखांदुर येथे दारू/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५ लिटर हातभट्टी दारु + २० किलो सडवा मोहा किंमती १३,०००/—रु. १२ लिटर ६० मिली लिटर देशी + विदेशी दारू किंमती ३८,००/—रु. व जुगारातुन किंमती ४५२०/—रु. असा एकुण किमती ९६२०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.